

कॅमेरा लेन्स

**नांदेड :** महिलेच्या अपहरण प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तारेवरची कसरत करत आरोपींच्या मुसक्या आवळल्या. त्यानिमित्त विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शशिकांत महावरकर यांनी स्थागुशाचे पोनि. द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान केला. या वेळी टिपलेले हे छायाचित्र.

देशोन्नती 10/05/2023

# जीव धोक्यात घालून स्थानिक गुन्हे शाखेने अपहरण प्रकरणातील आरोपींच्या आवळल्या मुसक्या

## विशेष पोलिस उपमहानिरीक्षकांनी केला पोनि चिखलीकर व टिमचा सन्मान

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ मुखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका महिलेचे अपहरण करून कारमध्ये पलायन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीच्या जीव धोक्यात घालून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या असून विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शशिकांत महावरकर यांनी स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या टीमचा सन्मान केला.

मुखेड येथील एका महिलेचे अपहरण करून कारमध्ये पळवून नेत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. या माहितीवरुन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून पोनि द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या पथकाने मुदखेड ते पुसद मार्गावरील पोफळी घाटात अत्यंत धोकादायक वळणावर सदर वाहनाचा सुमारे ३० कि. मि. पाठलाग केला, अशा वेळीही आरोपीने दुसऱ्या एका वाहनास धक्का देऊन पुढे पलायन केले. त्यानंतर पोलिसांनी याबाबत उमरखेड पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर उमरखेड पोलिसांनी नाकाबंदी करून कार थांबविण्यासाठी प्रयत्न करून यश मिळवले. यावेळी पोलिसांनी मच्छीन्द्र कोतलापुरे व ज्ञानेश्वर जाधव या दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईची दखल घेऊन विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शशिकांत महावरकर यांनी पोनि द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या टीमचा सन्मान केला. कारवाई केलेल्या या पथकात सपोउपनि संजय केंद्रे, गंगाधर कदम, संभाजी मुंडे आदींचा समावेश होता.